शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत शासकीय व शासकीय अनुदानित तंत्रनिकेतनातील/तंत्रसंस्थांतील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमतेत बदल व नवीन अभ्यासक्रमांना मान्यता व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. मान्यता २००७/(११८/०७)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक:- १३ जुलै, २००७

संदर्भ:- १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. ३३८२/११८३६/(१९०)तांशि-३ १अ, दिनांक २१ मे, १९८३

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मान्यता २००६/(२८७/०६)/तांशि-६, दिनांक १९ मे, २००७

३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/पदविका प्रस्ताव/२००७/१२०, दि.६ जून, २००७

४) विभागाचे पत्र क्र. मान्यता २००६/(१८७/०६)/तांशि-६, दिनांक २७ जून, २००७

शासन निर्णय:- सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील पदविका अभ्यासक्रम (अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र) राबविणाऱ्या संस्थेतील प्रवेश क्षमतेत बदल, नवीन अभ्यासक्रमांना मान्यता व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्वानुसार यासाठी संदर्भ क्र. २ अन्वये राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. सदरहू समितीच्या शिफारशी संचालनालयाने संदर्भ क्र. ३ अन्वये सादर केल्या होत्या व तदनुषंगाने या शिफारशी संदर्भ क्र. ४ अन्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या. सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र अ, ब, क व ड मध्ये प्रत्येक संस्थेसमोर नमूद केलेल्या पत्रान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने कळविल्यानुसार राज्यातील पदविका स्तरावरील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारित प्रवेश क्षमता बदल, नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्यास शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे.

१) शासकीय तसेच शासकीय अनुदानित तंत्र शिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी संस्थांवर बंधनकारक असतील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून यापुढे विहित करण्यात येणाऱ्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.

३) संबंधित संस्थेच्या नावासमोर नमूद केलेल्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या पत्रात व त्या पत्रासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.

४) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता आवश्यक राहील. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या पत्रान्वये मंडळाने ज्या संस्थांची शिफारस शासनास केली नसेल त्या संस्थांनी विहित पध्दतीनुसार तंत्र शिक्षण मंडळाकडे अर्ज करुन याबाबतची आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी.

५) सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या **प्रपत्र अ, ब, क व ड** मधील शासकीय व अनुदानित संस्थांतील प्रवेश क्षमतेतील वाढीसाठी आवश्यक पदनिर्मिती व आर्थिक तरतूद झाल्याशिवाय या संस्थांत वाढीव प्रवेश क्षमतेचे प्रवेश देण्यात येऊ नये.

२. या शासन निर्णयाच्या प्रपत्र अ, ब, क व ड मधील नवीन अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेतील बदल लागू करुन या संस्थांना यावर्षी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्याची कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी व तदनुषंगाने संस्थांची अद्ययावत यादी तयार करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ. गो. खडपकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय
३) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, बांद्रे (पूर्व), मुंबई
४) संबंधित संस्था

प्रत माहितीसाठी

१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्पलेक्स, आय. पी. इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
२) सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरन्स बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०
३) कार्यासन क्र. तांशि-२
४) निवड नस्ती/तांशि-६

| Sr.No. | Name & address of the Institute | Name of the course | Intake for 2006-07 | Intake for 2007-08 | Period of Approval | AICTE Approval Letter & date |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 5 | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Institute of Petro Chemical Engineering, Tal.Mangaon, Raigad-402103 | 1. Electrical Engg<br>2. Computer Engineering<br>3. Electronics & Telecomm. Engg<br>4. Information Technology<br>5. Chemical Engineering<br>6. Petrochemical<br>7. Polymer & Plastic<br>8. Instrumentation | 40<br>40<br>40<br>40<br>40<br>40<br>40<br>40 | 60<br>60<br>60<br>60<br>60<br>60<br>60<br>60 | 2007-2012 | 20/TMDE-1946 dated 28.6.2007 |
| | | | 320 | 480 | | |
| 6 | Government Polytechnic, Near Thimba Palace, Ratnagiri -415612 | 1. Civil Engg<br>2. Computer Engg<br>3. Electronics & Telecomm. Engg.<br>4. Mech. Engg<br>5. Electrical Engg | 60<br>40<br>60<br>60<br>60 | 60<br>60<br>60<br>60<br>60 | 2007-2012 | 740-89-038(E)/RC/95(47/TMDE-1925) dated 28.6.2007 |
| | | | 300 | 300 | | |
| 7 | Government Polytechnic, Kudalkar High Schook, Malvan. | 1. Civil Engg<br>2. Electronics & Telecomm Engg<br>3. Mechanical Engineering<br>4. Food Tech.<br>5. Computer Engg<br>6. Electrical Engg. | 60<br>60<br>60<br>20<br>0<br>0 | 60<br>60<br>60<br>20<br>60<br>60 | 2007-2012 | 740-89-056(E)/RC/95(50/TMDE-1928) dated 28.6.2007 |
| | | | 200 | 320 | | |

उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद, मालवण, जि. सिंधुदुर्ग, गडचिरोली, जि. गडचिरोली व ठाणे, जि. ठाणे येथे १९८५-८६ पासून शासकीय तंत्रनिकेतने सुरु करण्यास मंजूरी.......

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय, क्रमांक : जिटिआय १०८५/[६] तांशि-१-ब
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १७ सप्टेंबर, १९८५

पहा:- तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे
१] क्रमांक-९-एनडब्ल्यूआय १३८५-७१५, दि. २५ मे, १९८५ व
२] क्र-९-एनडब्ल्यूआय/१३८५/२६१७३, दि. १९ ऑगस्ट १९८५ चे पत्र.

शासन निर्णय:- मागास भागाच्या विकासास गती देण्यासाठी व शैक्षणिक दृष्टया भागीय समतोल राखण्यासाठी राज्यातील ज्या भागात पदविका अभ्यासक्रमांच्या सोयी नाहीत अशा भागात तंत्रनिकेतने स्थापन करण्याच्या शासकीय धोरणास अनुसरून या निर्णयाव्दारे उस्मानाबाद जिल्हयात उस्मानाबाद येथे, सिंधुदुर्ग जिल्हयात मालवण येथे, गडचिरोली जिल्हयात गडचिरोली येथे व ठाणे जिल्हयात ठाणे येथे १९८५-८६ या वर्षापासून शासकीय तंत्रनिकेतने सुरु करण्यास शासन मंजूरी देत आहे व तंत्रशिक्षण संचालकांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करावी असे त्यांना आदेश देत आहे.

२. उपरोक्त शासकीय तंत्र निकेतनांत प्रारंभी प्रत्येकि ३० प्रवेशक्षमतेसह स्थापत्य अभियांत्रिकी व यंत्र अभियांत्रिकी हे दोन पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात यावेत व योग्य वेळी सदर तंत्रनिकेतनांचा विकास करण्यात येऊन त्यामध्ये क्रमशः इतरही पदविका अभ्यासक्रमांचा अंतर्भाव करण्यासाठी प्रस्ताव सादर करावा.

३. उपरोक्त शासकीय तंत्रनिकेतनांसाठी १९८५-८६ या वर्षी कर्मचारी वर्गाची पुढील पदे निर्माण करण्यासही शासन मंजूरी देत आहे.

| अनु.क्र. | पदनाम व वेतन श्रेणी | उपरोक्त तंत्रनिकेतनांसाठी प्रत्येकी मंजूर करण्यात आलेली पदांची संख्या |
|---|---|---|
| | २. | ३. |
| | प्राचार्य [ रू. ११००-५०-१५५०-७५-१७००] | १ |

..२..